# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १८४** **दिनांक ९/०७/२०२१**

## "ऑपरेशन मुस्कान-१०" महाराष्ट्र अंतर्गत ५३ बालकांचा शोध घेण्यात यश- मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची कामगिरी.

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी "ऑपरेशन मुस्कान-१०" महाराष्ट्र हि लहान मुलांची शोध मोहिम दिनांक ०१.०६.२०२१ ते ३०.०६.२०२१ या कालावधीत राबविण्याबाबत आदेशित केले होते. त्या अनुषंगाने मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयमधील हरविलेली किंवा पळवून नेलेल्या बालकांचा शोध घेवून सदरची मोहिम प्रभावीपणे राबवुन १८ वर्षाखालील हरविलेली/अपहरीत मुल/मुली यांचा जास्ती-जास्त शोध घेण्याबाबत वरिष्ठांनी सुचना दिल्या होत्या.

वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनानुसार अ. मा. वा. प्रति. कक्ष-भाईंदर, नालासोपारा व पोलीस ठाणे निहाय ०१ पोलीस अधिकारी व ०२ पोलीस अंमलदार यांचे विशेष पथक तयार करुन दिनांक ०१.०६.२०२१ ते ३०.०६.२०२१ या कालावधीमध्ये ऑपरेशन मुस्कान-१० हि लहान मुलांची शोध मोहिम मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये प्रभावीपणे राबवुन १८ वर्षाखालील १६ मुल व ३७ मुली असे एकुण ५३ बालकांना ताब्यात घेवुन चौकशीअंती सर्व बालकांना त्यांचे पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. त्यामध्ये पोलीस ठाणे अभिलेखावरील ४३ बालकांचा व १० बेवारस बालकांचा सामावेश आहे. त्याचबरोबर एकूण २९४ हरवलेल्या महिलांचा शोध घेण्यात आला.

सदरची मोहिम डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर, नालासोपारा, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व पथक यांनी यशस्वीपणे पार पाडली.

-----oooo----